# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

क्र. 1600 /शि.वि. दि. 10/02/2014.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

.........सर्व......................... प्राथमिक/उच्च प्राथमिक शाळा.

**विषय :– सशस्त्र सेना ध्वजदिन निधी 2013 संकलनाबाबत.**

**संदर्भ** :– 1) जिल्हा सैनिक कार्यालय क्र.1148/ध्वनिस–13/जिसैकका–3 दिनांक 18.01.2014

2)शासन निर्णय क्र. मासैध्व 2013/प्र.क्र.404/13 दि. 20 नोव्हेंबर 2013

उपरोक्त संदर्भाकिंत विषयाचे अनुषंगाने सुचित करण्यरात येते की, भारताचे स्वातंत्र्य अबाधीत ठेवणाऱ्या सैनिकांचे आपण ऋणी आहोत. सैनिक हा त्यांच्या कुटूंब पुरताच मर्यादीत नसून तो देशातील सर्व जनतेला स्वतःचे कुटूंब समजून ऊन, पाऊस, यांची तमा न बाळगता वेळप्रसंगी प्राणाची आहूती देतो. सैनिक देशाच्या सीमांचे व स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करतांनाच देशात उद्भवणाऱ्या कायदा आणि सुव्यवस्था विषयक समस्या, नैसर्गिक आपत्ती जसे पूर, भूकंप, आग व अपघात इत्यादी प्रसंगी दूर्देवी नागरीकांच्या मदतीला त्वरेने धावून जावून बहूमोल कामगिरी बजावतोव प्रामाणिकपणे कर्तव्यपालन करतो. सैनिकांचे हे ऋण अल्पस्वक्षम स्वरूपात फेडण्याची संधी जनतेला ध्वजदिनाच्या निमित्ताने प्राप्त होत असते. भारतीय भूदल, नौदल, हवाई दलांतील वीरगती लाभलेल्या जवानांचे स्मरण करणे आणि अपंग सैनिकांच्या माजी सैनिक व त्यांच्या कुटूंबीयांच्या पुनर्वसनाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्याकरीता ध्वजदिन निधी उभारला जातो. त्यासाठी 7 डिसेंबर हा दिवस सर्वत्र "ध्वजदिन" म्हणून पाळला जातो.

करिता आपल्या शाळेतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचारी, कामगार यांच्याकडून खालीलप्रमाणे निधी गोळा करून या कार्यालयात दिनांक 21/02/2014 पर्यंत जमा करण्याची व्यवस्था करावी.

| | |
|---|---|
| 1) प्राचार्य/मुख्याध्यापक | रूपये 200/– |
| 2) शिक्षक | रूपये 100/– |
| 3) शिक्षकेत्तर कर्मचारी व कामगार | रूपये 50/– |
| 4) विद्यार्थी | रूपये 01/– |

**टिप** :– वरीलप्रमाणे गोळा करण्यात आलेल्या रकमेचे आपल्या शाळेचे नावे कार्यालयात रक्कम जमा करतांना पावत्या देण्यात येतील. जमा केलेल्या मूल्याच्या पावत्या प्राप्त झाल्याची खात्री करून घ्यावी.

**शिक्षणाधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर.**

**प्रतिलीपी** :–

1) मा. उपायुक्त म.न.पा. नागपूर.
2) शाळा निरीक्षक, झोन क्र. 1 ते 10, म.न.पा. नागपूर

PC:2/D/Reshma/Letter 2.doc